"केसरी"-"धनुर्धारी"-रचित-

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

## आपणावरील जबाबदारी.

हें पुस्तक,

जनार्दन महादेव गुर्जर

ह्यांनीं

मुंबईंत

निर्णयसागर छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

सन १८९२.

किंमत १॥ आणा.

# मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.

## आपणावरील जबाबदारी.

मनुष्य जन्मास आला कीं त्याच्या पाठीमागें कर्तव्य हें लागलेलें असतेंच. कर्तव्य ह्मणजे त्यानें अवश्य केलेंच पाहिजे असें काम. कर्तव्य कोणाला कधीं चुकलेलें नाहीं. आपलें खरें कर्तव्य कोणतें हें समजून घ्यावें आणि तदनुरूप वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करावा हा मनुष्यमात्राचा धर्म आहे. तो धर्म आपल्या हातून पाळला जात नाहीं, पाळला गेला नाहीं, आणि पाळला जाणार नाहीं, तर मनुष्यपणाला मुकावें लागेल. आपण कां जन्मलों? आपल्या जन्माचा उपयोग काय? आणि आपण जन्मून साधलें पाहिजे काय? याचा विचार प्रत्येकानें अवश्य आणि अगत्य केला

पाहिजे. त्याचप्रमाणें आपणावर जबाबदारी कोणती आहे? ह्मणजे कशाबद्दल आपणास जाब द्यावा लागेल याचाही विचार वेळींच जाहला पाहिजे. ह्मणजे आपणांकडे काम सोंपविलें कोणतें, आपण त्या संबंधानें कशी काय व्यवस्था केली वगैरेबद्दल कोणींना कोणी तरी जाब विचारणारा आहेच. त्यानें विचारण्यापूर्वी आपली तयारी आपण ठेविली पाहिजे. ज्यानें आह्मांस जन्म दिलें, आणि अनेक तऱ्हेच्या अनुकूलता व सोई करून ठेविल्या, त्याचा हेतु हा कांहीं तरी असलाच पाहिजे. आणि तो हेतु आहे तर त्याप्रमाणें आपल्याकडून घडलें किंवा नाहीं त्याचा जाब आपणांला दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं, हें उघड आहे. आपण या दुनियेंत वावरूं लागलों, तेव्हां आपल्यावर अनंत उपकार अनेकांचे आहेत, आपल्याला जन्म देण्याचा

उद्देश कांहीं आहे, तो सिद्धीस नेला पाहिजे, आपणांला येथें कांहीं कामेंही केलीं पाहिजेत, तीं न करूं तर त्याचा जबाब पुढें मागें दि-ल्याशिवाय गत्यंतर नाहीं. यास्तव त्याचा वे-ळींच विचार केला पाहिजे.

तेव्हां पहिला प्रश्न सकृद्दर्शनीं असा येतो कीं, आपणांवर जबाबदारी तरी कोणती आहे? तिचा अगोदर विचार करूं. स्थिति गति, योग्यायोग्यता, कालमान वगैरेच्या अनुरोधानें मनुष्यमात्रास आपापलें काम केलें पाहिजे. गरिबीच्या मानानें गरीबाचें, श्री-मंतीच्या मानानें श्रीमंताचें, शहाणपणाच्या-मानानें शहाण्याचें, असें काम असतें. त्याच-प्रमाणें कालमानाकडेही पाहिलें पाहिजे. आपला त्रास चुकविण्याकरितां ह्मणजे आपलें दरिद्र नाहींसें करण्यास, आपल्या देशाची इभ्रत वाढविण्यास, आपल्या देशबंधूंचें क-

ल्याण करण्यास, आणि लोकांकडून शाबास ह्मणवून घेण्यास, नंगीसमशेर हातांत घेऊन; स्वतःचा जीव ह्मणजे कःपदार्थ, अशा समजुतीनें, आपलें स्वामित्व हिरावून, आपला अपमान करणाऱ्या, आपणांस लुटून आपल्या देशांत येऊन शिरलेल्या, अशा परक्या, परधर्मी लोकांची गर्दन उडविण्यास धांवणें, हीच खरी कर्तबगारी व तेंच योग्य कर्तव्य, असें सतराव्या शतकांत समजलें जात असे, पण तो मनु हल्लीं नाहीं. काळ फिरला आहे. आपला देश, आपले देशीलोक, आणि आपले आपण या खातर स्वतःच्या जीवाची पर्वा न बाळगण्याइतकें उदार होणें हें रानटीपणाचें लक्षण ह्या मनूंत समजलें जातें. यास्तव तेव्हांचा तो काळ आणि आतांची ही वेळ यांच्यांतल्या तफावतीकडे लक्ष्य देऊन आपली जबाबदारी ओळखीत गेलें पा-

हिजे. त्याचप्रमाणें बालपण, यौवन आणि वृद्धत्व हें आयुःक्रमांतलें स्थितित्रय आहे तर त्या त्या कालाप्रमाणें आपणांस वर्तन ठेवावें लागेल, आपलें कर्तव्य कोणतें, आपणांवर जबाबदारी काय हा विचार, मनुष्य ह्मणविणाराला असणें योग्य आहे.

**ईश्वर, धर्म, आईबाप** आणि **देशबंधु** यांशीं, आपला सदा निकट संबंध असतो. तेव्हां त्यांच्याविषयीं जास्त विचार होईल तितका इष्टच आहे. या अखिल जगाचा उत्पन्न व रक्षणकर्ता आणि केवळ इच्छामात्रें करून त्रैलोक्याची यच्चयावत् घडामोड घडवून आणणारा सर्वसाक्षी, सर्वांतर्यामी, सच्चिदानंद परमेश्वर आणि त्याचे आह्मां प्राण्यांवरील अनंत उपकार, याचें यथास्थित वर्णन करणें मनुष्यमात्राच्या आवाक्याबाहेरचें आहे. त्या विश्वपित्याची अपूर्व कर्त-

बगारी, त्याची आह्मांवरील अपरिमित कृपा, असाधारण उपकारराशी, आमच्या संबंधाची अलौकिक कळकळ, आणि त्याची आटोकाट व जगड्व्याळ कार्यकुशलता वगैरे एक का दोन, हजारों गोष्टींसंबंधानें मन विचार करावयास लागलें ह्मणजे तें भांबावून वेडें होतें! हें जग ह्मणजे आहे काय? त्यांतील अद्भुत चमत्कार कोणते, व ते कसे घडतात? हरएक बाबतींत कौशल्यनिपुणता कशी ओतप्रोत भरली आहे वगैरे गोष्टींचा एक क्षणभर विचार मनांत आला तरी त्या परमेश्वराच्या अतर्क्य महिम्याची थोडथोडी तरी कल्पना येईल, किंवा इतकेंही खोल विचारांत न शिरतां आह्मी मनुष्यें आहोंत आणि आमच्या सोई करून देण्यांत ईश्वरानें कसें आपलें सामर्थ्य आणि कौशल्य खर्चिलें आहे, याचा विचार केला तरी पुरे

आहे ! माझ्या लहानग्या, लाडक्या वाचकांनो, तुह्मांस माहीत आहे काय? तुह्मी जन्मास आलां तेव्हां तुमचा देह किती लहान, कसा सुकुमार व दुबळा होता तो ? तुमच्या देहाचा अगदीं पहिला आकार सारा वीत दीडवीत होता, त्या वेळीं थोडासा वारा, एवढीशी थंडी किंवा अत्यल्प उष्णताही तुह्मांस सहन करण्याची शक्ति नव्हती; तोंड उघडून बोलेन, हात उचलून घेईन, पायानें चालेन अशी तुमची कांहीं स्थिति नव्हती, हें, दुसरीं तान्हीं मुलें पाहून तरी तुह्मांस कळलें असेल नाहीं? बरें, त्या तसल्या तुमच्या स्थितींत ईश्वरीयोजनेनें तुमचें कसें संरक्षण जाहलें, हें तुह्मांस निदान आतां तरी कळतें ना? आईबाप यांची योजना कोणी केली ? आईच्या अंगावर दूध कोठून आलें ? कांहींही संकटें सोसूं पण आपल्या बाळां-

च्या सुश्रूषेंत अंतर पडूं देणार नाहीं ही बुद्धि त्यांस कोणीं दिली? इच्छेप्रमाणें सर्व अनुकूलता तुमच्या आईबापांस कोणाच्या कृपेनें मिळत गेली? तुमच्या त्या वीतभर सुकुमार, दुबळ्या देहाचा एवढा आकार कसा जाहला? वगैरे विचार कधीं तुमच्या मनांत घोळतात काय? विचार घोळत असतील तर ईश्वर, त्याचें कौशल्य, त्याची करामत नांहीं का तुह्माला कळत? प्रतिवर्षी पृथ्वीच्या पोटांतून अन्नाचा सांठा कोणीकडून कसा येतो? तहान लागली तर हें घ्या पाणी ह्मणून नद, नद्या, ओढे इकडून तिकडे कां धांवत असतात? तळीं, विहरी, डबकीं छाती उताणी करून कां पडलीं आहेत? लता, तरु फलभारानें नम्र होऊन कां उभे राहिले? नित्यनियमानें अगदीं वेळेवर दिनमणि सूर्य कोणाच्या आज्ञेवरून उगवतो? पृथ्वीमाता

आपलें पोट फाडून कोणकोणत्या जिनसा कशा आणि कांरे बाबांनो, देते? इत्यादि गोष्टींचा थोडथोडकासा विचार तरी करीत जा. जनन आणि मरण या दोन अवस्थांचा, कांहीं ठावठिकाण तुह्मांकोणास कधीं लागला आहे? तेथें तुमची कांहीं बुद्धि लढविण्याची आशा व हिम्मत तुमच्यांत कोणाला आहे? डोळे उघडून वर आकाशाकडे कांहीं पाहतां तें काय आहे? ती कोणाची करामत? तेथें कांहीं तुमचा तर्क चालतो? अगाधजलधि तुह्मीं पाहिला असेलच. तें बाबांनो, कायरे आहे? झाडें, पुष्पें, फळें ही योजना कोणी कशीरे केली? त्यांत कोणाची कांहीं मति चालते! अशी प्रश्नपरंपरा कितीतरी वाढवितां येईल. पण त्यांत अर्थ काय आहे?

ईश्वर आणि ईश्वरीयोजना असें

ह्मणून स्वस्थ बसलें पाहिजे असेंच खरें. तर बोला तुह्मींच कीं, त्या अशा अतुलसत्ताधारी, अप्रतिमकुशल कारागीर, अनंतउपकारी **परमेश्वराची** तुह्मांवर केवढी ही मोहबत आहे? आणि त्या मोहबतीचें चीज तुह्मी कसें काय करणार तें? त्याच्या उपकारऋणाची तुह्माला कल्पना करितां येते ना? आणि तुह्मांस वाटतें काय कीं, अशा परमेश्वराचें स्तवन, अर्चन, पूजन स्मरण असें कांहीं तरी केलें पाहिजे ह्मणून? तुह्मांवर त्याची आहे याजपेक्षां जास्त कृपा हवी अशी इच्छा होणें साहजिक आहे आणि ती कृपा संपादण्याला त्याची प्रार्थना केलीच पाहिजे. त्याच्या कृतोपकाराबद्दलची कृतज्ञता दाखविणें चुकावयाचें नाहीं; ती कृतज्ञता व्यक्त करण्यांत कसूर घडेल तर त्याचें कांहीं ना कांहीं तरी प्रायश्चित्त भोगलेंच पाहिजे, हें

उघड दिसतें. आपणांवर झालेल्या उपकारांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं आणि आहेत यांजपेक्षां जास्त उपकार व्हावेत ह्मणून त्या कृपाघन, करुणार्णव परमेश्वराची प्रार्थना करणें अवश्य कर्तव्य आहे. शिवाय या चराचर अखिलसृष्टीचा परमेश्वर हा मालक आणि शास्ता आहे. तो राजांचा राजा. अन्यायानुसार शिक्षा करण्यांत तो मागें पुढें पाहत नाहीं. तो सर्वसाक्षी व सर्वज्ञानी आहे. अपराध घडला ह्मणून साक्षीपुरावा घेण्याचें त्याला कारण नाहीं. त्याजकडे फिर्याद न्यावयाला नको. मनुष्याच्या मनोवृत्ति मोठ्या उच्छृंखळ. क्षणोक्षणीं त्या बेफाम होतात. त्यामुळें अनेक अपराध घडतात आणि त्याबद्दलचें प्रायश्चित्त दिल्याखेरीज तो सहसा रहावयाचा नाहीं. परंतु पदर पसरून क्षमा मागितली, पुनः करणार नाहीं असें

पश्चात्तापपूर्वक त्यास विनविलें तर तो अपराधांची क्षमा करील. पुढें भीति असली ह्मणजे सहसा दुराचाराकडे प्रवृत्ति होत नाहीं. या सर्व कारणांसाठीं ईश्वराचे रोज उपकार मानावेत, त्याची प्रार्थना करावी, त्याची क्षमा मागावी आणि सदा त्याचें भय बाळगावें. ही अगदीं पहिली मनुष्यमात्राची जबाबदारी आहे. हें मनुष्याचें मुख्य कर्तव्य होय. यांत अंतर पडतां कामाचें नाहीं. पडेल तर ती होणारी हानि कशानें भरून यावयाची नाहीं. हें खचीत समजा.

ईश्वर, त्याची आज्ञा, त्याचें पूजन, त्याची स्तुति वगैरे विषयांचा विचार केलेला असून ईश्वरसंबंधीं सर्व माहिती करून देणारा खरा दोस्त ह्मणजे धर्म होय. धर्म ह्मणजे अमुकएक विवक्षित असें न धरितां

किंवा धर्माचीं अंगें, उपांगें वगैरेचें विवरण करण्याच्या भरीस न पडतां फक्त धर्म आणि त्याची आवश्यकता, योग्यता व त्यांतलीं मूलतत्वें यांचाच विचार करणें श्रेयस्कर वाटतें.

उदात्त विचार व सुखावह आयुःक्रम ह्यांच्या साधनाच्या तत्वांचा ज्यांत समावेश असतो तो धर्म होय. ह्मणजे धर्माच्या योगानें विचारांत थोरपणा आणि आचारांत श्रेष्ठता आली पाहिजे; निष्कलंक आचरण घडावें आणि निर्दोषविचार सुचावेत ह्मणून धर्माचा आश्रय करणें भाग आहे. तेव्हां धर्म ह्मणजे विचार आणि आचार यांचा शास्ता; गुरु किंवा नियामक होय हें सिद्ध जाहलें.

धर्माशिवाय राहणें मोठें दुर्घट व दुःसा-

१ आपल्या धर्माचें जास्त ज्ञान हवें असणारांनीं स्वधर्मज्ञान हें पुस्तक वाचावें.

ध्य आहे. कारण, दुःखितांचें सांत्वन दुर्बलांचा पाठिराखा, कष्टाळु प्राण्यांची विश्रांति, गरीबांची तृप्ति, क्लेशमयकृत्यांतली गोडी हा धर्म. कितीही संकटें आलीं, हालअपेष्टा जाहल्या तरी मी न्यायानें वागतों, माझ्या हातून अधर्म घडला नाहीं, माझा धर्म मला उपयोगी पडेल, तो दगा देणार नाहीं, संकटें आज उद्यां सरतील, संकटानें आपल्या धर्मबुद्धीची पारख होते, संकटांत योग्यता समजते. वगैरे प्रकारच्या समजुतीनें मनाचें फार सुरेख सांत्वन होतें दुर्बल असतात, त्यांना आपणास कोणी त्राता नाहीं असें वाटतें, त्यांचा सर्व भार काय तो धर्मावर. मी धर्माप्रमाणें वागतों, धर्म मला साहाय्य दिल्याशिवाय राहणार नाहीं, असें त्यांला वाटतें. आणि खरोखरीच धार्मिक मनुष्याच्या वाटेला कोणी सहसा कधीं जात नाहीं. त्याला

साहाय्य करण्याचीच ज्याला त्याला आवड असते. सारा दिवसभर काबाडकष्ट करावेत, थकून भागून बसावें अशा वेळीं धर्म, त्यांतले विचार इत्यादिकांचें नुसतें स्मरण सुद्धां मोठें आनंदकारक वाटतें. आपण अनेक संकटें सोसून एखादें काम करावें आणि तें पाहून आनंदी मुद्रेनें कौतुक मानणाऱ्या निष्कपटी आप्तानें शाबास ह्मटलें कीं, त्या श्रमांचा सर्व शीण जातो. त्याप्रमाणें धर्माकडे दृष्टि दिली कीं, आपल्या श्रमांचें कांहींएक वाटत नाहीं. गोरगरीब बिचारे श्रमलेले, निराश असे बसतात, त्यांना या धर्मामुळें फार तृप्ति वाटते. प्रसंगविशेषीं खुद्द प्राणांवर सुद्धां उदार होण्यास मनुष्य मोठ्या आनंदानें उद्युक्त होतो, तो या धर्माच्या जोरावर. आमच्या महाराष्ट्रमंडळांत गोखले बापू आणि पटवर्धन भाऊ हे मोठे दांडगे रण-

धुरंधर होऊन गेले. रणसंग्रामावर जाणें ह्मणजे बिचाऱ्यांना जणों काय लग्नसमारंभाला च जाणें वाटे! याचें किंवा पानपत, कर्नॉल सारखें भयंकर रणकंदन माजविण्यासाठीं मोठ्या ईर्षेनें व बहुरूपानें अडीचलाख मराठे जमले याचें कारण काय? खुद्द जिवावरल्या प्रसंगास सादर होऊन प्रत्यक्ष काळाच्या जबड्यांत शिरण्याची महाभयंकर लालसा त्यांना कां उद्भवली? त्यांत इतकी गोडी आली तरी कोठून? तर फक्त धर्माचा हा सारा प्रभाव आहे. **धर्मामुळें** या अचाट कृत्यांत एकप्रकारची त्यांना गोडी वाटत असे. त्याचप्रमाणें भिकारडें झोंपडें प्रत्यक्ष राजवाड्यासारखें सुखावह वाटण्याला कारण सुद्धां हा धर्मच होय. समाजाचा पाया हा धर्म; राष्ट्राचा प्राण हा धर्म किंवा एकंदरींत जग चालविणारी आदिशक्ति हा धर्मच;

असें ह्मटलें तरी चालेल. तेव्हां अशा धर्माची जाणूनबुजून उपेक्षा कोणी करावी. दोन दिवस अनुकूल आले किंवा र. ट. प. करण्याची ताकद आली कीं धर्मास विसरावें, त्याची आवश्यकता वाटूं नये, तेव्हां अशास काय ह्मणावें? ह्मणून थोडक्यांत एवढेंच सांगतों कीं, हा धर्म ह्मणजे तुह्मी आपला प्राण समजा; धर्म गमावाल तर तुमचें जिणें व्यर्थ, कवडीमोल, बिनकिफायतीचें असें तुमच्या अनुभवास येईल—पण तें अखेरीला, उपाय नाहीं तेव्हां—हें खूप ध्यानांत ठेवा.

अमुकएक धर्म चांगला किंवा अमुकएक धर्म वाईट याची विचक्षणा करण्याचें धार्ष्ट्य करणें मूर्खपण होय. तथापि आग्रहपूर्वक सांगणें माझें इतकेंच आहे कीं, सर्वांत प्रिय तुमचीं आईबापें, त्यांच्याहून तुमचें जास्त कल्याण इच्छिणारीं दुसरीं कोणी नाहींत.

त्यांच्या मनांत तुमचें अकल्याण व्हावें असें कदापि यावयाचें नाहीं. तेव्हां त्यांनीं लावून दिलेला किंवा तीं सांगतात तो आणि त्यांचें ज्यामुळें कल्याण जाहलें तो धर्म स्वीकारण्यांत तुह्मी अनमान करूं नका. भलतासलता धर्म ते तुह्मांस लावून देणार नाहींत, आपलें नुकसान जाहलें, आपलें कल्याण जाहलें नाहीं असा धर्म तुह्मांला ते कां बरें सांगतील? आणखी तुमच्या घरांत वंशपरंपरा आणि कित्येक शतकांपासून चालत आलेला धर्म तुमच्या एकट्याच्याच नुकसानीला कारण होईल हें संभवतें तरी काय? इतक्या शतकांचा आणि इतक्या वाडवडिलांचा अनुभव हा कीं, जो आपण पाळित आलों तो धर्म खरा कल्याणप्रद. आणि तो अनुभव डोळे मिटून मान्य करण्यांत कोणती बरें चूक आहे? आणखी इतकेंही करून तुह्माला आपल्या

आईबापांचा व वाडवडिलांचा धर्म आवडतच नसेल तर, पोक्त, अनुभवी आणि हितबुद्धीचे आप्त यांचा सल्ला घ्या, धर्म, धर्मतत्वें यांचा सर्व दिशेनें सावकास आणि शांतपणानें विचार करा, दूरवर दृष्टि पोंचवा आणि मग वाटेल तो धर्म स्वीकारा. पण याद राखा "हुराळली मेंढी आणि लागली लांडग्याच्या पाठीला" असें करूं नका! **स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः.** ह्यांत कितपत सत्यता आहे याचा विचार चांगला करा. याजपेक्षां धर्मसंबंधानें जास्त सांगण्यांत अर्थ नाहीं. आपापल्या धर्माचें स्वरूप ज्याचें त्यानें ओळखावें. **दांभिकपणा** आणि पक्षपात हे धर्माचे किडे आहेत ते काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपला धर्म व त्या संबंधाचें आपलें कर्तव्य पूर्णपणें ओळखावें. आपल्या धर्माचा छळ

होत आहे कीं काय, आपल्या धर्माची अवहेलना कोणी करतात किंवा कसें याचा विचार पाहून, आपलें घर, आपली मालमत्ता, आपले आईबाप, तसाच आपला धर्म समजून त्याप्रमाणें वागावें ही धर्मसंबंधाची जबाबदारी होय.

आईबापांसंबंधानें प्रथमतःच सांगितलें आहे. त्याचप्रमाणें बंधूंशीं कसें वागावें ह्याचाही उल्लेख करण्यांत आला, तेव्हां त्याची येथें पुनरुक्ति नको. परंतु आई आणि बंधु यांचें नातें सर्वांच्या सारखें आणि सदा लक्ष्यांत येत नाहीं त्याला उपाय काय? भूमाता आणि देशबंधु ह्मणजे काय याची कल्पना प्रथमदर्शनीं तुह्मांला यावयाची नाहीं. आई तशीच भूमीही एक आपली माता आहे. आमच्यामुळें आईला त्याचप्रमाणें भूमीला अनेक कष्ट सोसावे लागले, आम-

च्या सुखाकरितां आमची आई रात्रंदिवस झटते, तशीच भूमातेलाही आमच्याखातर बहुत श्रम होतात. आईचे उपकार अनंत त्याचप्रमाणें भूमातेचेही. पण भूमाता बोलत नाहीं, चालत नाहीं. ती अचेतन आहे. तिचें उपकारऋण फेडावयाचें ह्मणजे तिचा नांवलौकिक वाढेल, तिला लोक धन्यधन्य ह्मणतील असें करावयाचें. तिची छिः थूः होऊं नये ह्मणून जपलें पाहिजे. तिची कीर्ति लोकांनीं गावी असें करावें. तिचा लौकिक वाढेल, तिला धन्यता मिळेल, तिची कीर्ति गातील असें करावयाचें ह्मणजे आपल्या देशबंधूंस विद्या, नीति, संपत्ति यांहीं करून युक्त आणि कर्तृत्व शक्ति, हिंमत, तेजस्विपणा वगैरे सद्गुणांनीं मंडित करून मायदेश, मायभाषा, मायधर्म इत्यादिकांचे कट्टे भक्त बनवावें !

विद्या केवळ कल्पलता, विद्या अमोलिक द्रव्यभांडार, विद्या अलभ्यलाभ, विद्येनें पशुही मनुष्यासारखा होतो; मनुष्य, देव बनतो. याजपेक्षां विद्येचें जास्त महत्त्व तें काय सांगावें! अशा विद्येचें अर्जन, दान, संगोपन खरोखर महत्पुण्यप्रद. आमच्या मायदेशांत सुमारें साडेअठ्ठावीस कोटि लोक आहेत. ह्मणजे साडेअठ्ठावीस कोटि देशबंधु, सुदैवानें आपणांला ईश्वरानें दिले आहेत. पण त्यां. पैकीं फार फार तर साडेअठ्ठावीस लक्ष लोकांस कोठें लिहतां वाचतां येतें! बाकी बिचारे सर्व निरक्षर, ठोंब्ये. अवलंबित वर्गाचें मोठें कल्याण ह्मणजे त्यास स्वावलंबी करणें होय. विद्येची प्राप्ति ह्मणजे स्वावलंबाची पूर्णता. तेव्हां हें स्मरणांत ठेवा कीं परोपकार करण्याची, स्वकर्तव्य बजाविण्याची, आपल्या जन्माचें सार्थक करण्याची केवढी अमोलिक जबाबदारी

तुह्मांवर आहे बरें ? विद्यादान करीन ह्मणाल तर तें द्या ह्मणून हात पसरणारे किती तरी आहेत, विद्येचा प्रसार करण्यांत किंवा विद्यादानाच्या प्रसंगीं कशावर "उदक सोडावें लागतें" हें माहीत आहे ना ? ईश्वरी कृपेनें, देशबंधूंच्या मोहबतीनें व वडिलांच्या आशीर्वादानें तुह्मांस चार अक्षरें आलीं, तुह्मीं थोडीबहुत विद्या संपादन केलीत, त्याचें पर्यवसान हेंच काय कीं, मदोन्मत्तपणानें, स्वयश व द्रव्यसंपादन करण्यांत गुंग होऊन ज्यांच्या मोहबतीनें विद्या संपादन केली त्यांस विसरावें. दुर्व्यसनाच्या नानाढंगांत दंग होऊन आपल्या विद्येला काळोखी लावावी हा काय मनुष्यपणा ? आपल्या स्वतःचें किंवा आपल्या कुटुंबाचें तेवढें कल्याण झालें ह्मणजे झालें एवढीच कोती समजूत बाळगणें विद्वत्तेला शोभत नाहीं. यास्तव आपणांला

जें कांहीं थोडेंबहुत येतें किंवा ज्याच्यामुळें आपणांस कर्माजास्त योग्यता प्राप्त जाहली, त्याचा, सदोदित सद्व्यय करावा. बिचाऱ्या भुकेबंगाल, अडाणी, मूर्ख कुणब्यांनीं आपल्या पोटाला चिमटा घेऊन पैसा पुरविला तेव्हां आह्मांला विद्या मिळूं लागली आणि ती विद्या संपादतांच त्याच गरीबांस विसरतों नव्हे, जास्त लुबाडूं लागतों. हा कोण नराधमपणा बरें! फार सांगत नाहीं पण माझ्या लहानग्या वाचकांनो, एवढें ध्यानांत धरा कीं, तुह्माला थोडीबहुत विद्या प्राप्त आहली तर तिजवर तुमच्या देशबंधूंचा हक्क आहे. तो तुह्मीं मान्य केला नाहीं तर तुमच्या आईची–भूमातेची–तुह्मांवर इतराजी होईल. यास्तव कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारानें विद्याप्रसार करीत जा. सुस्त, दुर्व्यसनी, मदांध, आणि कर्तव्यशून्य होऊन बसूं

नका. असें होणें ह्मणजे मनुष्य असून पशु बनणें होय! यास्तव मनुष्य कसें व्हावें हें चांगलें शिका.

विद्या शिकून अगोदर **नीति** संपादन करावी, नीति खरोखर विद्येपेक्षां फार श्रेष्ठ. नीति असेल तर विद्येची मग इतकी पर्वा नाहीं; विद्या आहे पण नीति नाहीं तर त्या विद्येचा उपयोग खरोखर कांहींएक नाहीं, एवढ्यावरूनच नीतीचें महत्त्व तुमच्या ध्यानांत येईल. आणखी ह्या नीतीचा अभाव ह्मणजे एक भयंकर विष आहे. नीतीचा अभाव ह्मणजे अनीति. मनुष्याचा राहो, पण राष्ट्राचाही प्राण, ही अनीति हां हां ह्मणतां घेते. या अनीतिरूप सर्पिणीचा राष्ट्राला दंश जाहला कीं श्वास घेईन ह्मटलें तर सुद्धां फुरसत मिळत नाहीं. अशी अवस्था होते. आह्मां मराठ्यांचें बहुगुणी, महाप्रतापी, पूर्णतेजस्वी आणि अ-

गर्दी अप्रतिम असें हें राष्ट्र शेवटल्या बाजीरावाच्या पूर्ण कृपाकटाक्षानें वाढलेल्या अनीतीचा संपर्क होतांच कसें पटकन् मेलें, हें सर्वांस ठाऊक आहेच! लाखों क्रोडो मनुष्यें मिळून जाहलेलें जें राष्ट्र त्याची ही अशी दशा आणि इतकी राखरांगोळी कृत्या अनीति करून सोडते! मग मनुष्यमात्राचें काय विचारावें! एकानें अनीतीचें वर्तन करावें आणि त्याच्या पोराबाळांस माना खालीं घालण्याचा प्रसंग यावा. आणखी ज्या विचाऱ्यांनीं याला जन्म दिला, प्राणापलीकडे जतन केली, आपली चीजवस्त, होतें नव्हतें तें, सर्व दिलें अशा आईबापांच्या तोंडास काळोखी लागावी; असा प्रकार आमच्या इकडे झाला आहे. आपण स्वतः वाईट कर्म करून, त्याचें प्रायश्चित्त पुढील संततीला आणि मागील पूर्वजांना भोगावयाला लावणें हा अ-

धमाधमपणा नव्हे काय? अनीति ईश्वराला प्रिय नाहीं, अनीतीचा धर्मानें तिरस्कार केला आहे, कीर्ति, मान वगैरे इहलोकींच्या दुष्प्राप्य वस्तु अनीतीच्या स्पर्शमात्रेंकरूनच जळून खाक होतात; पूर्वजांच्या तोंडांस काळोखी लावणारी ही अनीति; वंशजांच्या माना वर न करूं देणारी ही अनीति; अशी सर्वत्र सारखी त्याज्यवस्तु, अनीतीपेक्षां दुसरी कोणतीच नाहीं. परंतु आमच्या दुर्दैवानें त्या अनीतीचें पीक आमच्या देशांत फार माजूं लागलें आहे. तें वेळींच खुडून टाकिलें पाहिजे. अनीति नाहींशी करणें ह्मणजे एक पुण्याची जोड मिळवून देणें होय. खोटेपणा, नानाप्रकारचे द्रोह, समाजरचनेचा उच्छेद आणि भयंकर व महादुष्ट दुर्व्यसनें हीं सगळीं नव्हे तर यांतील एकेक सुद्धां पहिल्या प्रतीची अनीति आहे. स्वतः

आपण तिची सावली घेऊं नये, दुसऱ्यावर पडत असेल तर त्याला हुषार करावें, तिची मिठी सोडविण्याला मदत करावी, हें मोठें सत्कृत्य आहे. नुसत्या कोरड्या उपदेशानें फारशी फलप्राप्ति होत नाहीं. स्वतःच्या आचरणाचा कित्ता पुढें ठेवावा लागतो. सावकास पण पूर्णपणें आपल्या आचरणाचा लोकांवर ठसा उमटेल असें करावें. हें मोठें पुण्य आहे. नीतीची मुलाखत करून देणाऱ्यांस देवाचा देव समजण्याचा आमच्यांत प्रघात आहे. तो फार उत्तम होय. देवाचा देव होण्याची अमोलिक संधि आपण होऊन दवडणारा मनुष्य काय शहाणा ह्मणावयाचा ? आणखी एवढा मोठा अधिकार व मान मिळतो तर त्याबद्दल कांहींही अडचणी सोसाव्या लागल्या, तरी बेहत्तर हें साधण्यास फक्त मनोवृत्ति स्वाधीन ठेविल्या आणि सदाचारानें

वर्तावयाचा निश्चय केला कीं पुरे. असो, तर आपल्या कुटुंबांत, आपल्या आप्तइष्टांत, आपल्या समाजांत आणि आपल्या देशबंधूंतही नीतिमत्ता जास्त वाढेल असें करणें सर्वांत प्रथमचें कर्तव्य आहे. ही जबाबदारी फार मोठी आहे. तिच्यासंबंधानें चुकारतट्टूपणा करतां कामा नये.

व्यावहारिकरीत्या सर्व पदार्थांत श्रेष्ठ काय तो पैसा. संपत्ति प्रपंची मनुष्याचें सौभाग्य. त्या संपत्तीखेरीज इहलोकीं मनुष्याला अनेक ठिकाणीं अनेक अडचणी येतात. निर्धनता ह्मणजे "महानरक" असें सर्वांस वाटतें. मोठा मर्दगडी पैशापुढें भागूबाई होतो; सद्गुणी पुरुष दुर्गुणी बनतो. असा अतर्क्यमहिमा या द्रव्याचा आहे. तसेंच काळजी, त्रास, दगदग, भीति, निंदा वगैरे अनेक अप्रिय वस्तूंचें मूळही या पैशांत असतें. तथापि ही गोष्ट अ

गर्दी निश्चित कीं, पैशाखेरीज मनुष्याचें जिणें व्यर्थ आहे. तेव्हां तो पैसा आपण मिळविला पाहिजे. पैसा मिळवावयाचा म्हणून, अन्याय, घातपात, चोरीचहाडी हीं करावयाचीं नाहींत. हें मात्र विसरतां कामा नये. हिय्या उद्योग, आणि काटकसर यांहींकरून द्रव्यप्राप्ति करून घ्यावी. तूर्तच्या प्रसंगीं आमच्या देशामध्यें व्यक्तिमात्रांत अठरा विस्वे दरिद्र भरलें आहे. आमच्या देशांतून दरसाल अगणित द्रव्य बाह्यदेशीं सातां समुद्रांपलीकडे जातें. आमच्या देखत आमच्या कष्टार्जित पैशाचे हवे तसे भलतेसलते व्यय होत आहेत. इलाज नाहीं! परदेशच्या व्यापारी लोकांनीं सगळा आमचा व्यापार बळकाविला! इकडला माल तिकडे ने व तिकडला इकडे आण, या धंद्यांतच सुमारें दरसाल तीसकोटि रुपये

**यदा परके व्यापारी मिळवितात.** आमच्या अंगावरील कपडे, आह्मांस लागणाऱ्या हरएक जिन्नसा—दिव्याच्या काडीपासून तों देवपूजेच्या साहित्यापर्यंत—आह्मांस परदेशचे कारागीर तयार करून देतात. सोळा आण्यांपैकीं साडेपंध्रा आण्यांचे पदार्थ, आह्मी परक्या कारागिरांनीं केलेले वापरतों. आमच्या देशांतले सर्व उद्योग परक्यांनीं बळकाविले. शेतें नांगरणारे सुद्धां परदेशचे आले आहेत ह्मणजे व्यापार, कलाकौशल्य, शेतकी हीं द्रव्योत्पादनाचीं साधनें; पण त्या तिहींसही आह्मीं मुकलों, जास्त मुकत चाललों, आणखी पुढें तर सर्वस्वीं पारखे होऊन बसूं! फार काय सांगावें, आमच्या देशबंधूंपैकीं हल्लीं **सातकोटि लोकांस पोटभर अन्न मिळत नाहीं. दोन कोटी** लोकांस उद्योग कोणता, कसा, कोठें

मिळवावा ही फिकीर आहे, आणि बाकीच्या लोकांस तुरुंगांतल्या कैदीच्या अन्नासारखें अन्न व वस्त्र यांजवर निर्वाह करावा लागत आहे. सरकारी कामदारच सांगतात कीं शेतकऱ्याचें उत्पन्न सरासरीनें दरसाल-१५ रुपये व इतरांचें अठ्ठावीस रुपये. आहे, आंकडेशास्त्राची तुह्मांला माहिती नाहीं; तें सांगत बसल्यानें कळावयाचें नाहीं; त्या विषयाची गोडी लागणें कठीण, ह्मणून माझ्या लहानग्या वाचकांनो तुह्मांस इतकेंच सांगावयाचें कीं आमच्या कपाळीं हल्लीं उपासमार आली आहे, अक्काबाईनें आह्मांस पुरें घेरलें आहे, सुदामजींच्या घरचा नकारघंटा सर्वत्र घणघण वाजूं लागला आहे. तेव्हां अशा प्रसंगीं उद्योग, साहस आणि नियमित काटकसर ह्यांच्या योगानें सर्व देशाचें राहो, पण ज्याचें त्यानें आपलें दरिद्र तरी दूर करून

घ्यावें. पैसा, ही दुष्प्राप्य वस्तु आहे आणि जगांतलें कर्तृत्व, पैशांत पुष्कळ आहे; पण पैसा मिळवितांना पापाचरणाची भीति फार बाळगिली पाहिजे. आपल्या देशबंधूंच्या नशीबीं उपासमार यावी, कुत्रेदेखील खाणार नाहींत इतके त्यांचे हाल व्हावेत, निराश व निराश्रित स्थितीमध्यें त्यांनीं खिचपत पडावें हें पाहून दया येणार नाहीं तो मनुष्य काय? त्याला विद्या मिळाली त्याचें चीज कोणतें? त्याच्यांत सामर्थ्य आहे त्याचा उपयोग काय? त्याची शरम यावी कोणाला? अभिमान धरावा कोणीं? असे प्रश्न आपल्याशींच करून पहा. आपण सुसंपन्न व्हावें, आ-

---

१ रा० चौबळकृत "दारिद्र्यविमोचन" व बडोद्याकडील कोणीएकानें छापलेला "पैसा" हे निबंध आणि संसार कसा करावा हें पुस्तक, एकवार तरी वाचावें अशी आग्रहपूर्वक शिफारस आहे.

पल्या कुटुंबाची दैना चुकवावी, आणि आप-
ल्यामुळें त्या चारचौघांस तरी भाकर मिळेल
असें करावें, ही एकप्रकारची जबाबदारी
आहे ती प्रत्येकानें ओळखावी, जबाबदारी वि-
सरल्यावर मनुष्यपणा तो कोणता राहिला ?

आणखी, मनुष्याचा मनुष्यपणा त्याच्या
अनेक गुणांवर असतो, ह्मणजे त्या गुणांचा
अभाव, हा त्याच्या माणुसकीला बट्टा ला-
वितो. उदाहरणार्थ समजा कीं, आह्मी मनुष्यें
आहोंत, या आमच्या आर्यदेशांतले आह्मी राह-
णारे, एकटेदुकटे आह्मीं नाहीं; अठ्ठावीस कोटि
ह्मणजे साऱ्या जगांतल्या लोकांच्या सहाव्या
हिश्शाइतके आहोंत. आह्मांवर ईश्वरी मोहबत
फार मोठी आहे. आमच्या पूर्वजांनीं साऱ्या
जगाचा अग्रेसरपणा एके कालीं मिळविला.
त्यांनीं दुनयेस थक्क करून सोडण्यासारखीं अ-
चाट कृत्यें केलीं. अशांचे आह्मी अस्सल वंशज,

पण हल्लीं त्यापैकीं काय आहे ? आमच्या पूर्वजांची कीर्ति गाण्याला देखील शरम वाटते. असें कशानें जाहलें ? ज्यानें उठावें त्यानें यावें, आह्मांस लुबाडावें, आह्मांस दासानुदास करावें, आमचें स्वातंत्र्य हिरावून घ्यावें, मनमानेल तसें वागवावें. इतकेंच नव्हे, ते सांगतील तो न्याय, ते ह्मणतील तें खरें आणि ते बोलतील तें एकून घ्यावें. असा प्रकार मनुष्यपणाला शोभत नाहीं. खरेंना ? आपल्या घरचा आपण कारभार करूं नये, करण्याची इच्छा दाखवूं नये हें काय मनुष्यपणाचें लक्षण ? सध्या इंग्रज प्रभूचें साम्राज्य आहे, तें आह्मांस सुखावह वाटतें, त्यांच्यामुळें आह्मांस पुष्कळ फायदे जाहले आहेत, गोष्ट खरी आहे. त्यांच्याशीं आह्मांला इमानानें वागलें पाहिजे त्यांत अंतर पडूं देतां कामा नये. पण आपल्यांत पशुपणा शिरत चालला याची वाट काय ? दु-

र्व्यसनाची मगरमिठी बसते याची शरम कोणाला? अठरा विस्वे दरिद्र येत चाललें याचें निवारण कसें करावें? मूर्ख, अगदीं गचाळ, असें ह्मणून ठिकठिकाणीं, मरणापेक्षां दुर्धर व असह्य मानखंडणा होते, याची शुद्ध नाहीं याला काय ह्मणावें? एकाची वार्ता एकाला नाहीं, आपण होतों कसे, जाहलों कोणत्या प्रकारचे आणि पुढें कोणत्या थराला जाणार याचा विचार करावा कीं नाहीं? आपसांतली फूट, परस्परांचें औदासीन्य, सर्वांची कर्तव्यशून्यता, एकंदर सर्वांची नेभळाई व कोडगेपणा यांचा प्रतीकार वेळींच जाहला, तरच आह्मीं मनुष्यें असें ह्मणावयाला तोंड तरी राहील! सद्गुणांचा ऱ्हास, आपल्या कर्तृत्वाची विसर, आपल्या ह्मणून असणाऱ्या पदार्थांची अभिमानशून्यता हें मनुष्यपणाला शोभत नाहीं. हीं सर्व पशूंचीं

लक्षणें; मनुष्यांचीं कांहीं नव्हत. आणखी, प्रस्तुतकाळचे आह्मीं ह्मणजे जशीं काय बाहुलीं जिवंत असून प्राणहीन कलेवरांप्रमाणें जाहलों आहोंत. कांहींही करा, कसेंही वागवा, हवें तें बोला, लागेल तें बुचाडा पण आमच्या तोंडांतून ब्र ह्मणून कांहीं निघत नाहीं. आह्मीं मनुष्यांचे पशु होत चाललों यास्तव ज्ञानाचें संपादन, सद्गुणांची अभिवृद्धि, कर्तृत्वशक्तीची जागरूकता, अभिमानाची उजळणी, मायदेश, मायधर्म व देशबंधु यांची आठवण पाहिजे. आपण होतों कोण, जन्मलों कोणत्या देशांत व कोणाच्या पोटीं, आहोंत कसे, असें जाहलें कशानें, पुढें करावें काय, याचा विचार हा प्रत्येकानें केलाच पाहिजे. मदांध मूर्खपणा सोडावा आणि ईश्वरावर हवाला देऊन आपल्यांतला पशुपणा नाहींसा करावा. निदान एवढें तरी पाहिजे कीं,

आपण मनुष्य आहों तर मनुष्यरत्न होण्याची इच्छा धरावी. फार काय सांगावें, आमची आर्यजननी पहा कशी हताश, हतवैभव, हतभागी जाहली व होऊन बसली, आमच्या मायभाषेची पहा कशी विडंबना चालली, तिचा तिरस्कार पहा कसा आमचे आह्मींच करीत आहों तो. आणि उत्तम अशा मायधर्माची दुर्दशा तर काय विचारावयालाच नको. दुर्दशेला कारण आह्मींच. यास्तव या सर्व गोष्टींचा अगोदर विचार करा, विचारानंतर आचार चालू ठेवा, आणि नंतर यश संपादा. जूट, कर्तव्याची जागरूकता, दृढनिश्चय, निरपेक्षता व प्रामाणिकपणा यांचा आश्रय बळकट असूंद्या. जन्मास रडत आलां तसे रडत मरूं नका. तुमच्या जन्माचा त्रास अनेकांनीं अनेक प्रकारें सोशिला, तुमच्या जिवंत राहण्यानें अनेकांस अनेक संकटें सो-

सावीं लागलीं. त्याचा मोबदला कांहींना कांहींतरी द्या. निमक हराम होऊन जाऊं नका, तरच तुह्मीं मनुष्यें, तरच तुह्मीं जन्मास आल्याचें सार्थक जाहलें. ही जबाबदारी फार मोठी आहे तींतून पार पडावयाचा यत्न करा. पार पडण्याची इच्छा धरा. "आला आला प्राणि जन्मासि आला. गेला गेला बापुडा व्यर्थ गेला" असें कोणांकडूनही ह्मणवून घेऊं नका याजपेक्षां जास्त कांहीं एक सांगणें नाहीं.

आम्रवृक्षाला मोहर येतो त्या सर्वांचे आंबे होत नाहींत, आंबे जाहलेले सर्व पिकतात असेंही नाहीं. आणि पिकलेले सर्व खावयास मिळतील असाही प्रकार नाहीं. तेव्हां आपल्या मायदेशाच्या प्रत्येक मनुष्यानें अमुक प्रकारें वागावें असें वाटतें ह्मणून हीं चार पानें आलीं तशीं लिहिलीं. तीं वाचणारे सर्वंच आपलें आचरण मायदेशाला धन्यता वा-

टेल अशा प्रकारें ठेवतील असा संभव नाहीं. पण त्यांपैकीं एक आपल्या कर्तव्याला जागला तरी आनंद वाटणार आहे. त्यामुळें हें एकचसें काय असलीं हजार पुस्तकें लिहून जाहलेल्या श्रमाचा मोबदला योग्य मिळाला असें समजण्यांत अंतर पडावयाचें नाहीं.

आतां हा प्रयत्न कितपत फलद्रूप जाहला किंवा अंगीकारलेलें काम कोणत्या प्रकारें तडीस गेलें याची शंका स्वतःला आहे. केवळ आंवाक्याबाहेरचें हें काम पत्करून "अव्यापारेषु व्यापारः" केल्या सारखें पुष्कळांस वाटेल यांत शंका नाहीं. पण हेतु कांहीं वाईट नाहीं. दिशाही चुकीची नव्हे एवढें खचीत आहे. यथामति, यथावकाश व यथायोग्य ही एक झोंपडी उठविली आहे. ती पाहून सुंदर हवेली उठविणारा कारागीर

भेटला तर, तो आनंद गगनांत मावावयाचा नाहीं, आणि असें झालें तर हें पुस्तक लिहिणाराचें आणि त्याच्या लहानग्या देशबंधूंचें तें महद्भाग्य, यांत काडीमात्र शंका नाहीं. तेव्हां तें भाग्य लाधावें अशी इच्छा आहे. पूर्ण करणार सर्वेश्वर. तो तसें करो ह्मणजे झालें.

# धनुर्धारी.

केसरी पत्रांत "वाग्बाण" सोडणारे लेखक "धनुर्धारी" यांजकडून आम्हीं निरनिराळीं पुस्तकें लिहविलीं आहेत, तीं छापण्याचें काम चालू आहे. तीं स्वस्त व सत्वर मिळावी यासाठीं आम्हीं खालील योजना केली आहे.

१ धनुर्धारी यांचीं पुस्तकें हवीं असणारांनीं आमच्या दुकानीं **दोन रुपये** आगाऊ भरावेत. पुस्तकें निघतील तशीं त्यांस आम्हीं पाठवीत जाऊं, व हिशेब कळवूं.

२. आगाऊ पैसा भरणारांस प्रत्येक पुस्तकावर मांडलेल्या किंमतीच्या पाउणपटीला पुस्तकें मिळतील. मागाहून घेणारांस पुरी किंमत.

३. शिवाय टपालहांशील आकारण्यांत येईल.

## ह्या सदराखालीं पुस्तकें छापत आहेतः—

१. मुलांचें चिमुकलें पुस्तकालय.
२. गापंनिकांचा पुस्तकसंग्रह.
३. कुलवधूंचा ज्ञानकोश.
४. महाराष्ट्र कुटुंबसंग्राह्य पुस्तकावली.

# केरकोकिल १८९१ चें

सबंद बांधलेलें सुंदर [illegible] ट. ख. ३ आणे
व्हा. पे. पाठवूं.

---

## सचित्र.

## केरळकोकिळमासिकपुस्तक.

मुलांनीं व स्त्रियांनीं वाचण्यास योग्य. वर्षांनीं सुंदर चित्रें १२ आणि नवीन, अपूर्व, चटकदार असले चमत्कारिक गमतीचे लेख, पृष्ठ २८४; रु० १८२ भरले कीं वर्षभर महिनेवारीनें वाचावयास मिळतात. अभिप्राय मागवा.

**मुलांची स्मरणवही—किंमत २ आणे.**

रावबहादुर रानडे—रावसाहेब सीं. वि. पटवर्धन इत्यादि गृहस्थांचे उत्तम अभिप्राय आले आहेत

( १-१४ )

जनार्दन महादेव गुर्जर,
रामवाडी, मुंबई.